**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

दिनांक 20/10/2023 (शुक्रवार) दुपार

---

## वाहतुक नाका चौकीतील चोरी करणारे आरोपी गजाआड
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कार्यवाही

दिनांक ११/०९/२०२३ रोजी फिर्यादी महेद्र पुरूषोत्तम सिरयागर हा गाडेगाड रोडवर पिपरी गावाला लागुन महाराष्ट्र शासन तर्फे वाहतुक नाका चौकी असुन सदर चौकीत असलेले मुद्देमाल कुलुप तोडुन आत ठेवलेले एलईडी टीवी डीव्हिआर माउस, प्लास्टीक खुर्ची, चार्जिग टॉर्च, स्टिट लाईट सीसीटीवी कॅमेरे असा मुददेमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याचे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कन्हान अप क्र. ५९३/२३ कलम ४५७, ३८० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

सदर गुन्हयाचे समांतर तपासा दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने आज दि. २०/१०/२०२३ रोजी पो. स्टे. कन्हान परीसरात सदर गुन्ह्यातील आरोपी यांचा शोध घेत असता मुखबीरद्वारे खबर मिळाली की सदर गुन्हा हा विधी संघर्षग्रस्त बालक याने त्याचे तीन साथीदार नामे– १) अजय संपत बावणे वय २४ वर्ष २) आकाश यशवंत गराडे वय २४ वर्ष ३) फरार कुंदन हिरे चारही रा. कन्हान यांचेसह केला आहे. या खबरे आधारे विधी संघर्षग्रस्त बालक व त्याचे दोन साथीदार आरोपी क्र. १) व २) यांना ताब्यात घेऊन सदर गुन्हयाबाबत सखोल विचारपूस केली असता सदर गुन्हा केल्याचे कबुली दिली. आरोपीतांच्या ताब्यातून १) एक lcd tv २) एक DVR ३) २ CCTV कॅमेरे ४) तीन खुर्ची ५) एक इन्व्हर्टर ६) एक माउस ७) CCTV ला लागणारे साहित्य असा एकूण ४६,०००/– रू. चा मुद्देमाल जप्त करून सदर गुन्हा उघडकीस आणला. गुन्हयातील सदर आरोपी यांची मेडीकल तपासणी करुन जप्ती मुद्देमालासह पुढील तपासा करीता पोलीस स्टेशन कन्हान यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गून्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक बट्टूलाल पांडे, सहायक फौजदार नाना राऊत, पोलीस हवालदार विनोद काळे, ईकबाल शेख, पोलीस नायक वीरू नरड, संजय बरोदीया यांनी पार पाडली.

## पाईप चोरी

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील मौजा मारोडी शेत शिवार मौदा येथे दिनांक १०/०९/२०२३ चे १०.३० वा. ते दिनांक १८/१०/२०२३ चे ११.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– शैलेश रामाजी रोशनखेडे, वय ४२ वर्ष, रा. वार्ड नं १३ मौदा यांची मारोडी शेत शिवारात वडिलोपार्जित शेती असुन शेतात पाणी देण्याकरिता वडिलांनी १४ पाईप आणले दोन महिण्यापुर्वी शेतामध्ये असणाऱ्या झोपडीमध्ये ठेवलेले होते. फिर्यादीच्या आईने दि. १८/१०/२०२३ चे ११/०० वा. जावुन बघितले असता यातील १२ पाईप किंमती १०,०००/–रू. कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि सोनेकर मो. नं ८९७५९२१७७० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**